# वसई - विरार शहर महानगरपालिका

## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय

## जाहिर ई - निविदा सूचना क्र.

वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार मधील खालील नमुद कामांसाठी निविदेतील अटी - शर्तीची पुर्तता करणाऱ्या सक्षम ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामांचे कोरे निविदा फॉर्म **https://vvcmc.maharashtra.e-tenders.in** या अधिकृत संकेतस्थळावर **दि.१३/०४/२०१८** ते **दि.०७/०५/२०१८** दु.३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या ई-निविदा **दि.०८/०५/२०१८** दु.३.०१ वा. ते **दि.०९/०५/२०१८** दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यप्रणालीद्वारे ऑनलाईन स्विकारण्यात येतील. सदर निविदा या ई - निविदेव्यतिरीक्त जुन्या पध्दतीप्रमाणे (मॅन्युअल पध्दतीने) स्विकारल्या जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) जिवदानी पायथा येथील क्रिकेट मैदान (ग्राऊंड) चे वार्षिक ठेका पद्धतीने देखभाल करणे. [बी - २ निविदा] | रु.७१,१९,३०९/- | रु.७१,१९३/- | रु.१०००/-<br>(अधिक १२% GST) | २% डी. डी. ने व<br>२ % बिलातून | ३ वर्ष |

**अटी व शर्ती :**

**टिप -**

१] ई-निविदा फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची (प्रिपरेशन) अंतिम दि.०७/०५/२०१८ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत राहील.

२] निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, इसारा अनामत रक्कम व सेवाशुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरावयाचे आहे. वरील सर्व शुल्क डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेटबँकिंग, RTGS, NEFT मार्फत भरणा

३] ठेकेदारांनी निविदा भरताना GST चा विचार करून निविदा दर भरावे.

४] ठेकेदारांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा तसेच क्र.१ मध्ये खालील कागदपंत्राचा समावेश असणे आवश्यक आहे.

**१] सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची छांयाकित प्रत**

**२] रु.१००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र**

**३] अशा प्रकारे काम केल्याचा अनुभवाचा दाखला [किमान ५ वर्षे]**

**४] तांत्रिक कर्मचारी वर्गाची यादी**

**५] G. S. T. सर्टिफिकीट**

**६] पॅनकार्ड नंबर**

**सदरची कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये नसतील तर निविदा बोलीचा लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.**

५] लिफाफा क्र.२ च्या लिफाफा मध्ये वित्तीय बाबींची कागदपत्र स्कॅन करुन शक्यतो पी. डी. एफ. फॉरमॅट (PDF Format) मध्ये अपलोड करावीत.

६] मुदतीत प्राप्त झालेल्या ई-निविदा शक्यतो त्याच दिवशी  दु.४ वाजून ०१ मी. अथवा इतर सोईच्या दिवशी उपस्थित निविदाकार / त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

७] निविदा प्रक्रियेचा तपशिल वरील संकेतस्थळावर (वेब साईटवर) उपलब्ध होईल.

८] **धनाकर्ष / बँक प्रतिपूर्ती हमी व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

**A. धनाकर्ष / बँक प्रतिपूर्ती हमी आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांच्या नावे असावा.**

**B. धनाकर्ष / बँक प्रतिपूर्ती हमी सरकारी बँक किंवा शेड्युल्ड बँकांकडून काढलेला असावा.**

**C. बँक प्रतिपूर्ती हमीची मुदत कामाच्या दोष दायित्व कालावधीनंतर एक महिना कालावधीपर्यंत असावी.**

**D. धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असावी.**

**E. धनाकर्ष / बँक प्रतिपूर्ती हमी प्रत Scan करून ई - निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.**

**F. धनाकर्ष / बँक प्रतिपूर्ती हमी सिलबंद लिफाफ्यामधून कंत्राटदारांनी निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यालय, विरार (पू.) कार्यालयात जमा करावा. लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदा सुचना क्र. लिहण्यात यावा.**

**G. निविदा उघडल्यानंतर लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या धनाकर्षाचे लिफाफे निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत परत करण्यात येईल.**

**H. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पूर्तता घेऊन ज्या कंत्राटदाराचे लिफाफा क्र. २ मधील देकार उघडण्यात येतील त्यामधील निम्नतम २ निविदाकारांचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदाराचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसात परत करण्यात येतील.**

**I. निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसात क्र. २ चे निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात येईल.**

**J. धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.**

**K. वरील पद्धतीमध्ये खोटी कागदपत्रे / बँक प्रतिपूर्ती / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात येईल तसेच काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या ठेकेदारांची नोंदणी १ वर्षासाठी स्थगीत ठेवण्यात येईल. यासाठी मा. उपायुक्त / कार्यकारी अभियंता यांना पूर्ण अधिकार राहतील.**

१०] निविदाकारांकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

११] काम समाधानकारक पूर्ण झाल्यावर प्राप्त परफॉर्मन्स सिक्युरिटीची रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल.

१२] ई - निविदा प्रणाली बाबत काही शंका असल्यास महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे संपर्क साधावा.

१३] इतर सविस्तर अटी-शर्ती ई-निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

जा.क्र.- व.वि.श.म. /बांध. /श.अ./१७/१८

दिनांक :- ११/०४/२०१८

सही/-

शहर अभियंता

वसई - विरार शहर महानगरपालिका